# POSITIVE STORY OF NAGPUR RULAR POLICE

## दिनांक १३/११/२०२५

## संघटीतरित्या अवैध देशीदारूची विक्री करणाऱ्या टोळीवर नविन कायदा भारतीय न्याय संहीता कलम ११२ (किरकोळ संघटित गुन्हेगारी) अन्वये कारवाई आरोपींना अटक ,मा. न्यायालयाने दिली पोलीस कोठडी सावनेर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन सावनेर येथील दाखल अपराध क्रमांक १००३/२०२५ कलम ६५ (ई) ,८३ म.दा.का मधील आरोपी नामे **१. नितीन तेजराम देखमुख, वय ४२ वर्षे, रा तेलकामठी, २. नंदकिशोर गुणाजी डांगे, वय ४० वर्षे, रा तेलकामठी, आणि ३. राजु दामोदर कश्यप , वय ५३ वर्षे, रा. सावनेर** यांच्यावर पोलीस सावनेर येथे २००७ पासुन सतत गुन्हे नोंद असुन नमुद आरोपी अवैध दारू विक्रीचे गुन्हे टोळीने करीत असतात.

यातील आरोपी नामे नितीन तेजराम देखमुख हा **टोळी प्रमुख असुन २. नंदकिशोर गुणाजी डांगे, ३. राजु दामोदर कश्यप हे सदस्य आहेत**. सदर टोळीचा प्रमुख हा स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैध दारू विक्री करतो तसेच त्याच्या टोळी सदस्यांना दारू विक्री करायला लावतो. टोळीचे सदस्य टोळी प्रमुखाच्या सांगण्याप्रमाणे अवैध दारू विक्री करतात. तसेच नमुद टोळी प्रमुख नितीन तेजराम देखमुख आडदांड आणि खुनसी स्वभावाचा असुन तो आपल्या टोळीसह बेकायदेशिर कृत्य करून टोळीचे वर्चस्व निर्माण करून परीसरात दहशत पसरवितो. नमुद आरोपीतांच्या टोळीवर एकुण ७ गुन्हे नोंद असुन नमुद आरोपीतांच्या टोळीवर कारवाई करत अपराध क्रमांक १००३/२०२५ कलम ६५ (ई) ,८३ म.दा.का या गुन्हयात नमुद टोळीवर मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर (प्रभारी) यांच्या मार्गदर्शनात सावनेर पोलीसांनी भारतीय न्याय संहीता कलम ११२ ( किरकोळ संघटीत गुन्हेगारी ) या कलमान्वये कारवाई केली.

सावनेर पोलीसांनी टोळी प्रमुख १. नितीन तेजराम देखमुख, वय ४२ वर्षे, रा तेलकामठी, आणि टोळी सदस्य २. नंदकिशोर गुणाजी डांगे, वय ४० वर्षे, रा तेलकामठी यांना सदर गुन्हयात अटक करून प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता मा.प्रथमवर्ग , न्यायालय, कळमेश्वर यांनी नमुद आरोपीतांचा पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे. नागपुर जिल्हया मध्ये संघटीतरित्या अवैध दारू विक्री करणाऱ्यावर आणि इतर अवैध धंदे करणाऱ्यांवर सतत अशा प्रकारच्या नविन कायदा भारतीय न्याय संहीता कलम ११२ (किरकोळ संघटित गुन्हेगारी) अन्वये कारवाया करण्यात येत आहेत.

तरुण भारत
Nagpur Pages | 2025-11-14 | Page- 2
epaper.tarunbharat.net

# सावनेरच्या मद्य तस्करांवर प्रथमच कठोर कारवाई

## संघटित गुन्हेगारी ठरविल्याने खळबळ

**सावनेर, १३ नोव्हेंबर**

ग्रामीण भागात वाढलेली मद्याची तस्करी ही पूर्णतः संघटित गुन्हेगारी आहे. हा भाग लक्षात घेता सावनेर येथे पहिल्यांदाच दारू तस्करांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ११२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. हे कलम किरकोळ संघटित गुन्हेगारीसाठी वापरले जाते. पहिल्यांदाच याचा वापर केल्याने गुन्हेगारांमध्ये खळबळ उडाली आहे.

नितीन तेजराम देखमुख, नंदकिशोर गुणा डांगे अशी आरोपींची नावे आहेत. या आरोपींची सावनेर परिसरात प्रचंड दहशत होती. ती दहशत पूर्णतः संपावी याकरिता पोलिसांनी कणखर भूमिका घेतली आहे. त्यानुसार त्यांना १४ नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

आरोपी नितीन देखमुख आणि नंदकिशोर डांगे, राजू दामोदर कश्यप हे तिघेही दारू तस्करीत पटाईत आहेत. ते सन २००७ पासून या धंद्यात सक्रिय आहेत. त्यांचा संपूर्ण रेकॉर्ड काढल्यावर पोलिसांनी त्यांच्या विरोधात किरकोळ संघटित गुन्हेगारी कायद्याचा वापर केला आहे.

यातील आरोपी नितीन देखमुख हा आडदांड आणि खुनशी स्वभावाचा आहे. त्याने आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी परिसरात दहशत वाढविली होती. त्याच्या विरोधात एकूण ७ गुन्हे दाखल आहेत. तरीही तो सुधारण्यास तयार नव्हता. ही बाब विचारात घेता कठोर कारवाईचा निर्णय घेण्यात आला आहे. मद्याच्या तस्करीत प्रचंड पैसा आहे. यामुळे या सर्व आरोपींचा दरारा वाढला होता. पण यामुळे सामान्य माणूस संकटात अडकला होता.

त्याचा संपूर्ण अभ्यास करून पोलिसांनी कठोर कारवाईचा निर्णय घेतला. यापुढे अशीच कठोर कारवाई करून जिल्ह्यातील अवैध धंदे संपुष्टात आणले जातील, असेही पोलिसांनी आपल्या कृतीतून स्पष्ट केले आहे.

(तभा वृत्तसेवा)

Powered by Bharati Web